# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२-२५५७२७२ कार्यासन दु. क्र. ०७१२-२५५७२६६

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


**अत्यंत महत्वाचे** क्र.तशिस/प्राकाना/शैवि-२/Transfer/२०१९/ 1858

दिनांक:- 21 JUN 2019

प्रति,

संचालक/प्राचार्य,

सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र /एचएमसीटी पदवीका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल (College Transfer) करण्याबाबत...

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/वि.सं.ब./ ६६९/, दि.२० जुन २०१९

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये सर्व विनाअनुदानित पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल करण्याकरीता संदर्भिय परिपत्राकान्वये निकष ठरवून दिलेले आहे. विद्यार्थ्यांना संस्था बदल करण्याकरीता संस्थेने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. संस्था बदल करण्याकरीता विद्यार्थ्यांना ना-हरकत-प्रमाणपत्र (NOC) देण्याकरीता अडवणूक करू नये.

२. विद्यार्थ्यांनी संस्था बदलाकरीता संदर्भिय पत्रासोबत दिलेल्या Annexure A (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न) मध्येच अर्ज करावयाचा आहे. सदरहू अर्जात Application ID, Institute Code, Course Choice Code अचुक दर्शविला आहे याबाबत संस्थेने तपासणी करूनच अर्ज या कार्यालयाकडे सादर करावा, प्रवेश बदल हा ऑनलाईन करावयाच्या असल्यामुळे Application ID, Institute Code, Course Choice Code अचुक असणे आवश्यक आहे त्याशिवाय संस्था बदल होणार नाही.

३. विद्यार्थी ज्या संस्थेत शिक्षण घेत आहे त्या संस्थेने विद्यार्थ्यास संस्था बदल करण्याकरीता NOC देतेवेळी संस्था बदलाच्या निकषात बसत असल्यास NOC प्रदान करावी व NOC ही विहित प्रपत्रात असणे बंधनकारण आहे. (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न)

४.विद्यार्थ्याला ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्यात Annexure A मध्ये अर्ज, पालक संस्थेची विहित नमुन्यात NOC प्राप्त करून जेवढे विद्यार्थी आपल्या संस्थेत संस्था बदलाने येणार आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे अर्ज आपल्या संस्थेच्या विहित नमुन्यात NOC व रिक्त जागेसह अभ्यासक्रमनिहाय दि.२६/०६/२०१९ पर्यंत एकत्रित प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

५.संस्थेने रिक्त जागा दर्शवितांना अचुक दर्शविण्यात याव्या. रिक्त जागांबाबत पुढे काही प्रकरण

उद्भवल्यास संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहितील याबाबत नोंद घ्यावी.

६. विद्यार्थ्याला **संस्था बदल तसेच अभ्यासक्रम बदलासह आतंर विभागीय बदल** ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्या अर्ज, पालक संस्थेची NOC, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडाळाचे पात्रता प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) प्राप्त करून एकत्रित अहवाल आपल्या संस्थेच्या NOC, रिक्त जागा व Annexure B मध्ये माहिती (Excel format मध्ये Soft Copy) या कार्यालयास सादर करावी. सदरहू विद्यार्थ्याच्या **संस्था बदलासह अभ्यासक्रम व आतंर विभागीय बदल हा तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई मार्फत करण्यात येणार आहे.** त्यामुळे तात्काळ कार्यवाही करावी.

७. प्रथम वर्षातून दुस-या वर्षात संस्था बदल/पाठयक्रम बदल करण्याकरीता प्रथम वर्षात (प्रथम व व्दितीय सत्रात) उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. दुसऱ्या वर्षातून तिसऱ्या वर्षात संस्था बदलीकरीता प्रथम वर्ष पुर्ण पास व तृतीय व चुतर्थ सत्रात पास होणे अथवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक असणे आवश्यक आहे.

८. **संस्था बदलीकरीता आवश्यक कागदपत्रे:**- १) सर्व गुणपत्रिका २) शिक्षण घेत असलेल्या संस्थेची विहीत नमुन्यात NOC ३) ज्या संस्थेत बदल हवा आहे त्या संस्थेची विहित नमुन्यात NOC (रिक्त जागेसह) ४) विहीत नमुन्यात विद्यार्थ्याचा Annexure A मध्ये अर्ज ५) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडाळाचे पात्रता प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) ६) संस्था बदलाबाबतची कारणे ७) GAP Certificate (आवश्यक असल्यास) ८) सर्व प्रक्रिया ज्या संस्थेत विद्यार्थ्याला संस्था बदल हवा आहे त्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत एकत्रित प्रस्ताव तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, सदर, नागपूर येथे सादर करावा.

९. **विद्यार्थी अथवा त्यांचे पालक यांना या कार्यालयात संस्था बदलाबाबत प्रस्तावासह पाठवू नये.**

वरीलप्रमाणे प्रक्रिया ही विहित मुदतीतच करावयाची असल्याने त्याबाबतचे प्रस्ताव **बुधवार दि. २६/०६/२०१९ पर्यंतच स्विकारण्यात येईल** याबाबत सर्व संस्थेने नोंद घ्यावी. त्यानंतर आलेले प्रस्ताव कुठल्याही परीस्थितीत स्विकारले जाणार नाही.

(डॉ. चंद्रशेखर थोरात)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक
कालमर्यादित

जा.क्र. १०/एनजीपी/वि.सं.ब./२०१९/ ६६९
दिनांक- 20 JUN 2019

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा :१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र ७७/१९) तांशि-५, दिनांक १७ मे २०१९

२) शैक्षणिक वर्ष २०१९-२० पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली

संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे ( अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी ) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार विद्यार्थी संस्था बदल व पाठ्यक्रम बदल इत्यादी साठी खालील तीन टप्प्यात कार्यवाही करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अ) संस्था अंतर्गत पाठ्यक्रम बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व द्वितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार पाठ्यक्रम बदलाची कार्यवाही करावी | दि.२५/०६/२०१९ पर्यंत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / पाठ्यक्रम बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सादर करावेत. | दि.२६/०६/२०१९ पर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल /संस्था बदलासह पाठ्यक्रम बदल मान्यता ( एकाच विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संस्था ) | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदल/संस्था बदलासह पाठ्यक्रम बदलाबाबत एकाच विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संस्थामधील प्राप्त अर्जाच्या (१ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणाऱ्या संस्था बदल/ संस्थाबदलासह पाठ्यक्रम बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी. | दि. २७/६/२०१९ | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब) संस्था बदल/ संस्था बदलासह पाठयक्रम बदल एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदला सह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदल प्रस्तावांची केंद्रीभूत नियमावली २०१९-२० मधील तरतुदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा. | दि.२७/६/२०१९ पर्यंत | सहसंचालक. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल (एका विभागीय कार्यालयातील संस्थेमधुन दुस-या विभागीय कार्यालयाअंतर्गत संस्थेतील बदल) /संस्था बदलासह शाखा बदल | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडून २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | -- | संचालक, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

टिप: द्वितीय वर्ष संस्था बदल / पाठयक्रम बदलाच्या अर्जावरील कार्यवाही रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद कालमर्यादेत करण्यात येईल. सदर कालमर्यादेनंतर प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे विद्यार्थी संस्था बदल/ संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबत शैक्षणिक वर्ष २०१९-२०पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावलीच्या माहिती पुस्तीकेतील पृष्ठ २८ व २९ वरील नियम १६ मध्ये नमूद केलेल्या १ ते ७ सूचनाचे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये/ संबंधित संस्था/ विद्यार्थी यांनी काटेकोर पालन करावे.

संचालनालयाचे स्तरावरुन अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे वर नमुद संस्था बदल/संस्था बदलासह पाठयक्रम बदलाबाबतची कार्यवाही दि. २९/६/२०१९ पर्यंत करण्यात येईल. सदर कालमर्यादे नंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१ सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एचएमसीटी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थाना त्यांचे स्तरावरुन कळविण्यात याव्यात.

२. प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी पदविका तंत्रनिकेतने

३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

४. कार्यासन क्रमांक १० निवड नस्तीस.

## Statement B

### Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second / Third year for A.Y. 2019-20

| Sr. No | Name of the Students | Application ID | Name of Current Institute | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Whether Admission is under Supernumer ary quota (Y/N) | Total Marks obtained (Out of Grand total) | % of Marks | Preferenced wise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks (Institute) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal

Name of the Institute :

DTE Code :-

## Statment C

### Statements Showing Vacancy Position for A.Y. 2019-20

| Sr. No. | Name of Branch | Year | Sanctioned intake 2018-19 or respective year of 1st year Admisson | Students admitted A.Y. 2018-19 (as per Col. 4) | Vacancy [ Col. 4-5 ] | Student in pipeline (Backlog passed students) | Sudents admitted to the course due to Change of branch at Institute level | Sudents shifted to other course due to Change of branch at Institute level | Net Vacancy available [Col. (6+9)- (7+8-)] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 9 |
| | | First | | | | | | | |
| | | Second | | | | | — | — | |
| | | Third | | | | | — | — | |
| | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal

**Pro forma-T**

This certificate shall be issued on letter head of institute

Ref. No.

Date:

**NO OBJECTION CERTIFICATE FROM PARENT INSTITUTE**

This is to Certify that Mr/Ms..........................................................has passed Ist Sem. & IInd Sem. / first year (full pass / with one ATKT) during year 20 - , Diploma in.................................. He is seeking admission to Second Year (3rd Semester) in ........................................................................../DTE............... institute code through Change of Institute. I have No Objection if /she get Admission in that Institute.

Seal of institute

Principal

---

This certificate shall be issued on letter head of institute

Ref. No.

Date :

**NO OBJECTION CERTIFICATE FROM ADMITTING INSTITUTE**

This is to Certify that Mr/Ms..........................................................has passed Ist Sem. & IInd Sem. / first year (full pass / with one ATKT) during year 20 - , Diploma in...................... from institute ...................................................... He is seeking admission to Second Year (3rd Semester) in course .................................. We have no objection for his /her transfer to our institute. No of vacancies in .................course are ........................... excluding 10% additional seats for direct second year admission.

Seal of institute

Principal

## APPLICATION FORMAT FOR ADMISSION BY TRANSFER

1. Name of the Student (In Full) : ..............................................
2. Address for Correspondence with Pin Code and Telephone Number : ..............................................
   ..............................................
3. Institute and Semester where Currently Studying : ..............................................
   ..............................................
4. Details of the Result of Last Exams

| Branch | Year/ Semester | Year of Passing | Summer/ Winter | Full pass /pass with one ATKT | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

5. Institute where admission by transfer is sought: ..............................................
6. Branch & Year /Semester in which admission: Branch..............................
   Year/Semester............... is sought.
7. Reason for asking the transfer of Institutes and Change of branch (if any):
   ..........................................................................................
   ..........................................................................................

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and if is upto the authority to decide my case on the basis of its merit.

Date :

Signature of Student

Documents attached:
1. All Marksheets,
2. NOC's ,
3. 1st year Admission receipt,
4. Document related to reason for asking transfer etc